


# १
# राज्य अर्थव्यवस्था



# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ सन २०१९-२० च्या पुर्वानुमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत ५.७ टक्के वाढ तर देशाच्या अर्थव्यवस्थेत ५.० टक्के वाढ अपेक्षित आहे. 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रात सन २०१९-२० मध्ये ३.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०१९-२० मध्ये 'उद्योग' व 'सेवा' क्षेत्रात अनुक्रमे ३.३ टक्के व ७.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. पुर्वानुमानानुसार सन २०१९-२० साठी सांकेतिक ('नॉमिनल') (चालू किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ २८,७८,५८३ कोटी अपेक्षित आहे आणि वास्तविक ('रिअल') (सन २०११-१२ च्या स्थिर किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ २१,५४,४४६ कोटी अपेक्षित आहे.

- सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक (१४.३ टक्के) आहे
- सन २०१८-१९ च्या तुलनेत सन २०१९-२० च्या सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्नात ₹ २,४५,७९१ कोटी वाढ अपेक्षित आहे
- सन २०१९-२० चे दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,०७,७२७ अपेक्षित आहे

१.२ पहिल्या सुधारित अंदाजानुसार सन २०१८-१९ चे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २६,३२,७९२ कोटी होते, तर ते सन २०१७-१८ मध्ये ₹ २३,८२,५७० कोटी होते. सन २०१८-१९ चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २०,३९,०७४ कोटी होते, तर ते सन २०१७-१८ साठी ₹ १९,२३,७९७ कोटी होते. सन २०१८-१९ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न ₹ १,९१,७३६ होते, तर ते सन २०१७-१८ मध्ये ₹ १,७५,१२१ होते.

दरडोई राज्य उत्पन्न आणि सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+++ | २०१७-१८++ | २०१८-१९+ | २०१९-२०$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ९९,५९७ | १,१२,०९२ | १,२५,२६१ | १,३२,८३६ | १,४६,८१५ | १,६३,७३८ | १,७५,१२१ | १,९१,७३६ | २,०७,७२७ |
| सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (₹ कोटी) | १२,८०,३६९ | १४,५९,६२९ | १६,४९,६४७ | १७,७९,१३८ | १९,६६,२२५ | २१,९८,३२४ | २३,८२,५७० | २६,३२,७९२ | २८,७८,५८३ |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज $ पुर्वानुमान

सन २०१८-१९ करिता निवडक राज्यांचे दरडोई उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | हरियाणा | कर्नाटक | तेलंगणा | तामीळनाडू | महाराष्ट्र | आंध्र प्रदेश | मध्य प्रदेश | उत्तर प्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | २,२६,६४४ | २,१०,८८७ | २,०५,६९६ | १,९३,७५० | १,९१,७३६ | १,६४,०२५ | ९०,९९८ | ६१,३५१ |

सन २०२० करिता जागतिक स्थूल उत्पादनाचे वृद्धिदर

| तपशील | जागतिक | विकसित अर्थव्यवस्था | विकसनशील अर्थव्यवस्था | अल्प विकसित अर्थव्यवस्था | अमेरीकेची संयुक्त राज्ये | जपान | चीन | भारत$ | महाराष्ट्र$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थूल उत्पादनाचे वृद्धिदर (टक्के) | २.५ | १.५ | ४.० | ५.१ | १.७ | ०.९ | ६.० | ५.०^ | ५.७^^ |

$ सन २०१९-२० करिता ^ राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांचेकडील प्रथम पुर्वानुमान ^^ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील पुर्वानुमान

## किंमती

१.३ राज्याच्या ग्रामीण व नागरी भागाचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत अनुक्रमे २९८.१ व २८२.२ होता तर एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीत तो अनुक्रमे २७३.० व २६५.७ होता. सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भागात ९.२ टक्के व नागरी भागात ६.२ टक्के होता, तर एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीत तो अनुक्रमे ०.६ टक्के व १.९ टक्के होता.

> ➢ 'शिव भोजन' प्रति थाळी ₹ १० या दराने राज्याच्या सर्व जिल्ह्यांतील गरीब व गरजू लोकांना दि. २६ जानेवारी, २०२० पासून पुरविण्यात येत आहे

१.४ सन २०१९-२० मध्ये डिसेंबरपर्यंत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट एकूण पात्र १५०.५८ लाख शिधापत्रिकाधारकांपैकी १४६.०३ लाख शिधापत्रिकांची आणि १४ अवर्षणप्रवण जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील शेतकऱ्यांपैकी एकूण पात्र ९.१६ लाख शिधापत्रिकाधारकांपैकी नऊ लाख शिधापत्रिकांची आधार जोडणी पूर्ण करण्यात आली आहे.

१.५ राज्यातील ५२,४२३ रास्त भाव दुकानांमध्ये अन्नधान्य वितरणाकरिता 'पॉईंट ऑफ सेल' उपकरणे बसविण्यात आली आहेत. डिसेंबर, २०१९ मध्ये सुमारे १.३९ कोटी कुटुंबांनी आधार आधारीत बायोमेट्रिक अधिप्रमाणनाद्वारे शिधावस्तूंचा लाभ घेतला.

१.६ 'एक देश, एक शिधापत्रिका' ही योजना १ जानेवारी, २०२० पासून देशात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत लाभार्थी देशातील कोणत्याही भागातील रास्त भाव दुकानांमध्ये कार्यान्वित 'पॉईंट ऑफ सेल' या उपकरणाच्या सहाय्याने पोर्टेबिलिटीच्या माध्यमातून रास्त दराने अन्नधान्य विकत घेऊ शकतात.

## लोकवित्त

> ➢ अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० नुसार वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.१ टक्के तसेच ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १६.४ टक्के असून हे दोन्ही निर्देशक चौदाव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या वित्तीय मर्यादेत आहेत
>
> ➢ अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० नुसार भांडवली जमेचा एकूण जमेतील आणि भांडवली खर्चाचा एकूण खर्चातील हिस्सा अनुक्रमे २२.२ टक्के व १७.३ टक्के आहे.
>
> ➢ अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० नुसार विकास खर्चाचे एकूण महसुली खर्चातील प्रमाण ६८.० टक्के आहे

१.७ राज्याची सन २०१९-२० अर्थसंकल्पीय अंदाजानुसार महसुली जमा ₹ ३,१४,६४० कोटी, तर सन २०१८-१९ सुधारित अंदाजानुसार ₹ २,८६,५०० कोटी आहे. अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० नुसार कर महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ₹ २,५७,४५५ कोटी आणि ₹ ५७,१८५ कोटी आहे. एप्रिल ते डिसेंबर,२०१९ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ २,१४,३७६ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६८.१ टक्के) असून ती सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाजानुसार तत्सम कालावधीच्या तुलनेत १२.८ टक्के अधिक आहे.

१.८ अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० नुसार राज्याचा महसुली खर्च ₹ ३,३४,९३३ कोटी असून सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाजानुसार ₹ ३,०१,४६० कोटी आहे.

१.९ अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० नुसार महसुली तूट, वित्तीय तूट आणि ऋणभार अनुक्रमे ₹ २०,२९३ कोटी, ₹ ६१,६७० कोटी व ₹ ४,७१,६४२ कोटी आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

१.१० राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ३१ मार्च, २०१९ रोजी एकूण ठेवी व स्थूल कर्जे अनुक्रमे ₹ २५.५० लाख कोटी व ₹ २७.१५ लाख कोटी होते. अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे ३१ मार्च, २०१९ रोजी कर्ज-ठेवी प्रमाण १०६.५ टक्के होते.

> - दि. १५ ऑगस्ट, २०२० पर्यंत नंदुरबार जिल्हा १०० टक्के डिजिटली सक्षम करण्याचे निश्चित करण्यात आले आहे
> - देशातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी व स्थूल कर्जे यामध्ये महाराष्ट्रातील बँकांचा हिस्सा दि. ३१ मार्च, २०१९ रोजी अनुक्रमे २०.३ टक्के व २७.७ टक्के होता
> - प्राधान्य क्षेत्रासाठी सन २०१९-२० ची राज्याकरिता वार्षिक कर्ज योजना ₹ ४.२४ लाख कोटी आहे

१.११ प्राधान्य क्षेत्रासाठी सन २०१९-२० च्या वार्षिक कर्ज योजनेंतर्गत 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राचा हिस्सा २०.६ टक्के आणि 'एमएसएमई (अति लघु, लघु, मध्यम उद्योग, खादी व ग्रामोद्योग)' क्षेत्राचा हिस्सा ५५.५ टक्के आहे.

१.१२ प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या कर्जामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. सन २०१८-१९ मध्ये ४३.८६ लाख ('शिशु' अंतर्गत ३७.५१ लाख, 'किशोर' अंतर्गत ५.१० लाख व 'तरुण' अंतर्गत १.२५ लाख) लाभार्थ्यांना एकूण ₹ २५,७४२ कोटी कर्ज वितरित करण्यात आले.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१३ मान्सून २०१९ मध्ये सरासरी पावसाच्या ११२.६ टक्के पाऊस राज्यात पडला. राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळून) १५२ तालुक्यांमध्ये अतिरिक्त, १८२ मध्ये सरासरी आणि २१ मध्ये अपुरा पाऊस पडला.

१.१४ कृषी गणना २०१५-१६ नुसार सरासरी वहिती क्षेत्रामध्ये राज्याचा (१.३४ हेक्टर) सर्व राज्यांमध्ये अकरावा क्रमांक आहे. अल्प व अत्यल्प (२.० हेक्टर पर्यंत) वहिती खातेदारांचे एकूण क्षेत्र ९२.२० लाख हेक्टर असून एकूण वहिती क्षेत्राच्या ४५.० टक्के होते, तर अल्प व अत्यल्प वहिती खातेदारांची संख्या १२१.५५ लाख असून, ती एकूण वहिती खातेदारांच्या ७९.५ टक्के होती.

१.१५ सन २०१९-२० च्या खरीप हंगामामध्ये १४९.६१ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया व कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे नऊ टक्के, तीन टक्के, एक टक्का व २४ टक्के वाढ अपेक्षित असून उसाच्या उत्पादनात ३६ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१६ सन २०१९-२० मध्ये रब्बी पिकांखालील क्षेत्र ५०.८७ लाख हेक्टर असून ते गतवर्षीच्या तुलनेत ५.६ टक्के जास्त आहे. गत वर्षीच्या तुलनेत तृणधान्ये व कडधान्ये यांच्या उत्पादनात अनुक्रमे ४३ टक्के व २३ टक्के वाढ अपेक्षित असून तेलबियांच्या उत्पादनात २४ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१७ सन २०१९-२० मध्ये फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र १६.५० लाख हेक्टर असून २४२.७१ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे, तर सन २०१८-१९ मध्ये १६.५१ लाख हेक्टर क्षेत्रात २३०.३५ लाख मे. टन उत्पादन झाले.

राज्यातील पाऊस व पीक उत्पादन

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पावसाची सरासरीच्या तुलनेत टक्केवारी | १०२.३ | ९०.३ | १२४.६ | ७०.२ | ५९.४ | ९४.९ | ८४.३ | ७३.६ |
| पीक | उत्पादन ('००० मे.टन)$ | | | | | | | |
| तृणधान्ये | १०,२७६ | ८,६६७ | १०,६७७ | ९,२५९ | ७,२१० | १२,६४६ | १०,९४४ | ७,९४७ |
| कडधान्य | २,२२५ | २,२६२ | ३,११४ | २,०१९ | १,५४५ | ४,५८४ | ३,६८४ | २,६८३ |
| एकूण अन्नधान्ये | १२,५०१ | १०,९२९ | १३,७९१ | ११,२७८ | ८,७५५ | १७,२३० | १४,६२८ | १०,६३० |
| तेलबिया | ४,४८५ | ५,०८७ | ५,२९४ | २,८५० | २,४३६ | ५,११३ | ४,२०८ | ४,८८५ |
| ऊस | ८६,७३३ | ६९,६४८ | ७६,९०१ | ८४,६९९ | ७३,६८० | ५४,२३७ | ८३,१३८ | ८९,७७९ |
| कापूस (रुई)@ | ७,२०० | ७,६५५ | ८,८३४ | ७,००० | ७,५०० | १०,७५५ | ६,०९४ | ६,५९३ |
| फळे | १०,५३८ | ९,७८५ | १३,४५८ | ११,०९० | ९,७५० | १०,६३० | ११,७२९ | १०,७७८ |
| भाजीपाला | ८,७७८ | ८,००८ | १०,१६२ | ८,७८३ | ९,४५२ | १०,५२० | १२,३०७ | ११,४७२ |

$ खरीप, रब्बी आणि उन्हाळी अंतर्भूत  @ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये  # अंतिम अंदाज

➢ शेतकऱ्यांनी दि. १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीत घेतलेले व ३० सप्टेंबर, २०१९ रोजी थकीत असलेले कर्ज माफ करण्यासाठी 'महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना २०१९' मंजूर केली असून मूळ रक्कम व व्याज मिळून ₹ दोन लाखापर्यंतचे कर्ज, जमीन धारणा क्षेत्राची मर्यादा विचारात न घेता माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाने सन २०१९-२० मध्ये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ₹ १५,००० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे

१.१८ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) प्रकल्पाद्वारे ३० जून, २०१९ अखेर ५१.२३ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आणि २०१८-१९ मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ३५.९७ लाख हेक्टर (७०.२ टक्के) होते. लघु सिंचन (स्थानिक क्षेत्र) प्रकल्पांद्वारे ३० जून, २०१९ अखेर १८.९६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आणि २०१८-१९ मध्ये ८.४९ लाख हेक्टर (४४.८ टक्के) क्षमता वापरण्यात आली.

१.१९ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी एकूण उपयुक्त जलसाठा २३,००४ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार उपयुक्त जलसाठा क्षमतेच्या ५२.८ टक्के होता.

१.२० वार्षिक कर्ज योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रासाठी वार्षिक लक्ष्य ₹ ८७,३२२ कोटी होते. सन २०१९-२० मध्ये डिसेंबर अखेर वित्तीय संस्थांद्वारे ₹ २४,८९७ कोटी पीक कर्ज वाटप करण्यात आले तर सन २०१८-१९ मध्ये ते ₹ ३१,२८३ कोटी होते. सन २०१९-२० मध्ये सप्टेंबर अखेर ₹ १८,१४७ कोटी रकमेचे कृषी मुदत कर्ज वाटप करण्यात आले, तर सन २०१८-१९ मध्ये ते ₹ ३६,६३१ कोटी होते.

१.२१ प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांनी सन २०१८-१९ मध्ये शेतकऱ्यांना एकूण ₹ १२,०१० कोटी कर्ज वितरित केले.

१.२२ जून ते ऑगस्ट, २०१८ या कालावधीत सुमारे ३७,९८८ हेक्टर क्षेत्र अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झाले होते. त्यासाठी ₹ १३९.१९ कोटी रकमेची नुकसान भरपाई २०१९-२० मध्ये मंजूर करण्यात आली. सन २०१८-१९ च्या रब्बी हंगामात राज्यात तीन तालुक्यातील सुमारे ६४,२३१ हेक्टर क्षेत्र दुष्काळामुळे बाधित झाले होते. त्यासाठी ₹ ५६.६१ कोटी रकमेची नुकसान भरपाई २०१९-२० मध्ये मंजूर करण्यात आली. सन २०१९ च्या खरीप हंगामात टंचाईमुळे बाधित झालेले बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांतील अनुक्रमे अंबेजोगाई आणि परांडा हे दोन तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले. अंबेजोगाई मध्ये तीव्र व परांडामध्ये मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला. माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये 'क्यार' व 'महा' या चक्रीवादळांमुळे झालेल्या अवकाळी पावसाने राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३४९ तालुक्यांमधील शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झाले. शेतीपिकांसाठी ₹ ८,००० प्रति हेक्टर व फळपिकांसाठी ₹ १८,००० प्रति हेक्टर या दराने जास्तीत जास्त दोन हेक्टर क्षेत्रासाठी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

१.२३ सन २०१८-१९ मध्ये दुधाचे एकूण उत्पादन ११६.५४ लाख मे. टन होते तर सन २०१७-१८ मध्ये ते १११.०२ लाख मे. टन होते. शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे दैनिक सरासरी दूध संकलन सन २०१८-१९ मध्ये अनुक्रमे १.७९ लाख लिटर व ४९.१४ लाख लिटर होते, तर ते सन २०१७-१८ मध्ये अनुक्रमे ०.८९ लाख लिटर आणि ४९.१६ लाख लिटर होते.

१.२४ सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन सन २०१८-१९ मध्ये अनुक्रमे ४.६७ लाख मे. टन व १.०० लाख मे. टन होते, तर सन २०१७-१८ मध्ये सदर उत्पादन अनुक्रमे ४.७५ लाख मे. टन व १.३१ लाख मे. टन होते.

१.२५ सन २०१८-१९ अखेर राज्याचे एकूण वनक्षेत्र ६१,९३६ चौ. किमी होते.

## उद्योग व सहकार

> ➢ मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम बेरोजगार तरुणांकरिता सुरु करण्यात आला आहे. या योजने अंतर्गत वस्तुनिर्माण व सेवा क्षेत्रातील घटकांचा समावेश आहे. वय वर्षे १८ ते ४५ या गटातील पात्र व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात येईल व स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित केले जाईल. उत्पादन क्षेत्रासाठी ₹ ५० लाख व सेवा / व्यवसाय क्षेत्रासाठी ₹ १० लाख मर्यादेत प्रकल्प खर्च असेल. यासाठीचे समभाग भागभांडवल बँकएंड अनुदानात परिवर्तित करण्यात येईल जे राज्य शासन बँक कर्जाच्या अनुसार देईल. योजनेची ठळक वैशिष्ट्ये :
>
> - स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन - किमान एक लाख सूक्ष्म उपक्रम
> - रोजगाराच्या संधी निर्माण करणे - किमान १० लाख
> - युवकांसाठी उद्योजकता विकास कार्यक्रम - दोन लाख युवक
>
> ➢ राज्यातील स्टार्टअपची संख्या डिसेंबर, २०१८ मधील २,५८७ वरुन सप्टेंबर, २०१९ मध्ये ४,३२४ अशी वाढली आहे
>
> ➢ सन २०१९-२० मध्ये सप्टेंबर पर्यंत राज्यातील थेट विदेशी गुंतवणूक ₹ २५,३१६ कोटी होती
>
> ➢ मुंबई पर्यटन प्रकल्पासाठी ₹ १०० कोटी, शिवनेरी किल्ल्यासाठी ₹ २३ कोटी व रायगड किल्ल्यासाठी ₹ २० कोटी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे

१.२६ ऑगस्ट, १९९१ ते ऑगस्ट, २०१९ या कालावधीत राज्यात ₹ १३,०२,५१८ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या एकूण २०,५०१ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी ₹ ३,०६,८६२ कोटी (२३.६ टक्के) गुंतवणुकीचे ९,०९९ प्रकल्प (४४.४ टक्के) कार्यान्वित झाले व त्याद्वारे सुमारे १३.२३ लाख रोजगार निर्मिती झाली.

१.२७ एप्रिल, २००० ते सप्टेंबर, २०२० पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक ₹ ७,३९,३०६ कोटी असून ती देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणुकीच्या २९ टक्के होती.

१.२८ डिसेंबर, २०१९ अखेर राज्यात एकूण ₹ २,१३,४०० कोटी गुंतवणूक व ७८.९२ लाख रोजगार क्षमतेच्या १४.९० लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांनी उद्योग आधार क्रमांक प्राप्त केले आहेत.

१.२९ वार्षिक उद्योग पाहणी २०१७-१८ नुसार स्थूल मूल्यवृद्धित (₹ २,६४,९०३ कोटी) राज्य अग्रस्थानी आहे व देशाच्या स्थूल मूल्यवृद्धित राज्याचा हिस्सा १८.० टक्के आहे.

१.३० दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिकेचा एक भाग म्हणुन ‘पायी कामावर जाणे’ या संकल्पनेवर आधारित सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर अशा राज्यातील १०,००० एकर क्षेत्रात औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे. गुंतवणुकदारांना ऑरिकमधील सुमारे ५३ भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. ऑरिकमध्ये ₹ ५,००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे २,५०० रोजगार निर्मिती झाली आहे.

१.३१ ‘दृष्टिक्षेपात भारत पर्यटन सांख्यिकी - २०१९’ अहवालानुसार सन २०१८ मध्ये देशातील ११.९१ कोटी पर्यटकांनी व विदेशांतील ०.५१ कोटी पर्यटकांनी राज्यात भेटी दिल्या.

१.३२ राज्यात ३१ मार्च, २०१९ रोजी सुमारे ५.३८ कोटी सभासद असलेल्या २.०६ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी १० टक्के कृषि पतपुरवठा, १० टक्के बिगर-कृषि पतपुरवठा तर ८० टक्के इतर कार्यात गुंतलेल्या संस्था होत्या.

## पायाभूत सुविधा

### ऊर्जा

> ➢ ३१ मार्च, २०१९ रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता आणि २०१८-१९ मध्ये राज्यातील वीज निर्मिती देशात सर्वाधिक होती
>
> ➢ नवीकरणीय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेनुसार राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे
>
> ➢ सन २०१८-१९ मध्ये प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापरामध्ये देशात राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे

१.३३ सन २०१८-१९ मध्ये एकूण १,६१,२९७ दशलक्ष युनिटस् (केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त विजेसह) वीज निर्मिती झाली असून राज्यातील एकूण विजेचा वापर १,३१,८६६ दशलक्ष युनिटस् होता.

१.३४ महावितरणची सन २०१९-२० मध्ये डिसेंबरपर्यंत १७,६११ मेगावॅट विजेची सरासरी कमाल मागणी होती व २,७६८ मेगावॅट वीज अतिरिक्त होती. सन २०१८-१९ मध्ये १८,४७८ मेगावॅट विजेची सरासरी कमाल मागणी होती व १,३३६ मेगावॅट वीज अतिरिक्त होती.

१.३५ सन २०१८-१९ मध्ये महापारेषणची पारेषण हानी, महावितरणची वितरण हानी आणि ‘एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक’ हानी अनुक्रमे ३.११ टक्के, १३.६३ टक्के व १७.४१ टक्के होती.

## परिवहन

> नवी मुंबई मेट्रो (अंदाजित किंमत ₹ ३,०६४ कोटी), नागपूर मेट्रो (अंदाजित किंमत ₹ ८,६८० कोटी ) व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प (अंदाजित किंमत ₹ ११,४२० कोटी ) यांचे काम प्रगतीपथावर आहे
>
> मुंबई मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द (₹ १७,३९६ कोटी), कुलाबा-वांद्रे-सिप्झ (₹ २३,१३६ कोटी), वडाळा-कासारवडवली-गायमुख (₹ १५,४९८ कोटी), ठाणे-भिवंडी-कल्याण (₹ ८,४१७ कोटी), स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी (₹ ६,६७२ कोटी ) व अंधेरी ते दहिसर-मिरा भाईंदर (₹ १२,८१५ कोटी ) ची कामे प्रगतीपथावर आहेत
>
> प्रवासी वाहतूक सुकर व्हावी व नवी मुंबईची झपाट्याने वाढ व्हावी यासाठी 'मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प' (अंदाजित किंमत ₹ १७,८४३ कोटी) प्रगतीपथावर आहे
>
> नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (अंदाजित किंमत ₹ १६,७०४ कोटी) विकसित करण्यात येत आहे

१.३६ मार्च, २०१९ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे ३.०१ लाख किमी होती.

१.३७ मुंबई व नागपूर यांना जोडणारा ' हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ' हा आठ पदरी (७०१ किमी लांब व १२० मीटर रुंद) द्रुतगती महामार्ग प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचा एकूण अपेक्षित खर्च ₹ ५५,३३५.३२ कोटी आहे. या महामार्गासाठी एकूण ९,५९९.९९ हेक्टर जमीन आवश्यक असून ८,३११.१५ हेक्टर (८७ टक्के) भूसंपादन झाले आहे.

१.३८ राज्यातील रस्त्यावरील वाहनांची संख्या १ जानेवारी, २०२० रोजी ३७१ लाख (प्रति किमी रस्त्यामागे १२३ वाहने) होती, तर १ जानेवारी, २०१९ रोजी ३४८ लाख (प्रति किमी रस्त्यामागे ११५ वाहने) होती.

१.३९ सन २०१८-१९ मध्ये मोठी बंदरे व लहान बंदरे यांच्या मार्फत झालेली एकत्रित मालवाहतूक १,७१५.३९ लाख मे. टन होती, तर ती मागील वर्षी १,६१२.८४ लाख मे. टन होती.

१.४० सन २०१८-१९ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे ३.४५ लाख मे. टन व ६.७८ लाख मे. टन होती तर सन २०१७-१८ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ३.०९ लाख मे. टन व ६.४९ लाख मे. टन होती. सन २०१८-१९ मध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून झालेली प्रवासी वाहतूक अनुक्रमे ४६८.१२ लाख व १४६.३३ लाख होती तर सन २०१७-१८ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ४५४.१७ लाख व १३८.३३ लाख होती.

१.४१ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २०१८-१९ मध्ये प्रति दिन सरासरी १६,४१४ बसेसमधून ५५.८३ लाख किमी प्रवास करुन ६५.९६ लाख प्रवासी वाहतूक केली आहे.

## सामाजिक क्षेत्र

१.४२ सन २०१८-१९ मध्ये एकूण १,०६,२३७ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळा होत्या व त्यांतील पटावरील विद्यार्थ्यांची संख्या १५७.४ लाख होती. सन २०१८-१९ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) २७,४४६ शाळा होत्या व त्यांतील पटावरील विद्यार्थ्यांची संख्या ६६.१ लाख होती.

१.४३ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालानुसार सन २०१८-१९ मधील उच्च शिक्षणातील पटसंख्या ४२.३ लाख होती. सन २०१८-१९ करिता उच्च शिक्षणातील स्त्री-पुरुष समानता निर्देशांक ०.९० होता.

- सन २०१७ मध्ये अर्भक मृत्यूदर १९ होता
- सन २०१७ मध्ये पाच वर्षाखालील अर्भक मृत्यूदर, नवजात शिशु मृत्यूदर व एकूण जनन दर हे अनुक्रमे २१, १३ व १.७ होते
- सन २०१५-१७ मध्ये माता मृत्यूप्रमाण ५५ होते
- पाच वर्षांखालील बालकांचा मृत्यूदर व माता मृत्यू प्रमाण याकरीता शाश्वत विकास ध्येयांतर्गत निश्चित करण्यात आलेली लक्ष्ये राज्याने साध्य केली आहेत
- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सन २०१९-२० मध्ये नोव्हेंबर पर्यंत एकूण ४८,७५४ स्वसहाय्यता गटांना ₹ ७२६.६० कोटी पतपुरवठा करण्यात आला
- राज्यात दोन समूह विद्यापीठे स्थापन झाली आहेत

१.४४ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील सर्व ३४ जिल्हे, ३५१ पंचायत समिती आणि २७,६६८ ग्राम पंचायती १८ एप्रिल, २०१८ रोजी खुली हागणदारीमुक्त (ओडीएफ) म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

१.४५ स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत, १ ऑक्टोबर, २०१७ रोजी राज्यातील ३८४ शहरे ओडीएफ म्हणून घोषित करण्यात आली. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत नोव्हेंबर, २०१९ पर्यंत २३० शहरांना ओडीफ+ व ६२ शहरांना ओडीफ++ म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

१.४६ एकात्मिक महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये डिसेंबर पर्यंत, सुमारे ४.४४ लाख शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले असून त्यावर ₹ ९०६.९६ कोटी खर्च झाला.

१.४७ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांमधील ग्रामीण भाग व त्या भागातील ‘क’ वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे. दारिद्र्याची समस्या हाताळण्यासाठी उपजिविकेच्या संधी प्राधान्याने निर्माण करण्यावर भर देऊन कार्यवाही करण्यासाठी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांच्या सहकार्याने प्राथम्याने २७ तालुक्यांसाठी ‘दारिद्र्य कमी करण्यासाठी कृतीकक्ष’ स्थापन करण्यात आला आहे.

* * * * *